# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२६५१**

**अपिलार्थी श्रीमती सागरबाई किसन गवळी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून सक्षम प्राधिकारी-२(टे.३)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.
तिसरा मजला, ए विंग,प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, सक्षम प्राधिकारी-२**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.
तिसरा मजला, ए विंग,प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.१२.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०६.२०२४ | ०७.०८.२०२४ | १५.०७.२०२४ | २३.०८.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०८.२०२४ रोजीच्या अर्जान्वये अपूर्ण माहिती दिली असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०७.०८.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २३.०८.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १३.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"आपल्या कार्यालयाने (१) श्री. अहमद अली इनामदार (निवासी) पात्र करण्यात आले दि.०८.०३.२०१६. (२) श्री. दत्ता हनुमंता देवकाते (निवासी) पात्र करण्यात आले दि. ०५.०९.२०१५. या दोन सभासद यांना पात्र करण्यात आले असून यांना कोणत्या कागदपत्रांवर पात्र करण्यात आले याची कागदपत्रांची सत्यप्रती देण्यात यावी."*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०८.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, *आपण माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये शास्त्री नगर एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संचिकेमधील श्री. महमद अली इनामदार, श्री. दत्ता हनुमंता देवकाते यांना कोणत्या कागदपत्रावर पात्र केले आहे याची मागणी केली आहे. मागणी केलेल्या माहितीपैकी पुरवणी परिशिष्ट -II ची माहिती या कार्यालयात उपलब्ध असून*

..२/-

*माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपणांस हवी असलेली माहिती प्रति पृष्ठ रक्कम रुपये २/- (दोन रुपये) प्रमाणे एकूण ४/- (चार रुपये) या कार्यालयात समक्ष हजर राहून शासन जमा करावी. म्हणजे उपलब्ध माहिती पुरविण्यात येईल.*

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १५.०७.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०८.२०२४ रोजी अपिलार्थींना दि. २६.०८.२०२४ पर्यंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेशित केले.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर दि. २६.०८.२०२४ रोजी अपिलार्थींना कार्यालयातील उपलब्ध माहिती देण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास सादर केले की, अपिलार्थी याच विषयावर वारंवार माहिती अर्ज सादर करतात व झोपडपट्टी धारकांचे परिशिष्ट- II सन २०१५ साली बनविण्यात आले होते व त्यांचे कार्यालयातील सर्व कर्मचारी यांनी कार्यालयाच्या अभिलेखात सर्व अर्जांचा व स्वयंघोषणापत्र व स्वसाक्षांकन या कागदपत्रांचा शोध घेतला असता संबंधीत कागदपत्रे आढळून आलेले नाहीत. श्री. अहमद अली इनामदार (निवासी) व श्री. दत्ता हनुमंता देवकाते (निवासी) यांचेकडून त्यांनी सादर केलेले दस्तावेज प्राप्त करुन अपिलार्थींना उपलब्ध करुन दिलेले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींनी माहिती मिळालेली आहे अशी स्वाक्षरी असलेली नोंदही आयोगास सादर केली.

६. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

11-12-2025

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : ११.१२.२०२५** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**